## ई - निविदा

राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नाती अभियान, नवी मुंबई कार्यालय अंतर्गत विभागीय / जिल्हा पातळीवर मिनी सरस (प्रदर्शन) आयोजनासाठी एक वर्षासाठी लागणारी विविध साहित्य (भाडेतत्वावर) व सेवा गरजेनुसार पुरविण्यासाठी पुरवठादार संस्थेची निवड करण्याबाबत

शासन निर्णय क्रमांक: मावज-२०२०/प्र.क्र.३३/का-३४ दि. १६ मार्च २०२० मधील Event and Exhibition Media मधील Category A व B मध्ये नोंदणीकृत असलेल्या मर्यादीत संस्थांसाठी.

निविदा संदर्भ क्रमांक: MSRLM/SMMU/MINISARAS/03/23-24

ई- निविदा क्रमांक (ID) : 2023_MSRLM_ 948337

दिनांक:- २६/०९/२०२३

-जारी कर्ता–
मुख्य कार्यकारी अधिकारी
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष
५वा मजला, सिडको भवन, दक्षिण बाजू, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -४००६१४
संकेतस्थळ- https://www.umed.in

१) **निविदा (Bid) सादर करण्यासाठी निमंत्रण:-**

**अ)** दीन दयाल अंत्योदय योजना, हि योजना ग्रामीण भागातील गरीबी निर्मूलनासाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने सुरू केलेली महत्वाकांक्षी योजना आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम-उमेद) २०११ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एनआरएलएम) - आजीविका यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली. गरिबांच्या शाश्वत जीवनशैलीचा मार्ग म्हणून कार्य करणाऱ्या समाजावर आधारित संस्था तयार करून त्यांची मजबुती करून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. अभियान राज्यात सर्व जिल्हात इंटेन्सिव पद्धतीने राबविण्यात येत आहे. उमेद –महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे राज्य कार्यालय, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे आहे.

**आ)** राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नाती अभियान, नवी मुंबई कार्यालय अंतर्गत विभागीय / जिल्हा पातळीवर मिनी सरस (प्रदर्शन) आयोजनासाठी एक वर्षासाठी लागणारी विविध साहित्य (भाडेतत्वावर) व सेवा गरजेनुसार पुरविण्यासाठी पुरवठादार संस्थेची निवड करण्याबाबत ई - निविदा पद्धतीने निवड करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहे.

**इ)** सदरची निविदा दोन किंवा अधिक निविदाधारक एकत्रितरित्या सादर करता येणार नाही (Joint Venture/ Consortium)

**ई)** या निविदा सूचनेच्या प्रतिसादात आपली निविदा सादर करण्यापूर्वी निविदाधारकांना या निविदा दस्तऐवजाचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. या निविदेच्या प्रतिसादात जे निविदा सादर करतील त्यांनी या निविदा सूचनाचा काळजीपूर्वक अभ्यास आणि या दस्तऐवजाची तपासणी केल्यानंतर सर्व अटी, नियम त्यांचे परिणाम समजून घेतले असे मानले जाईल.

**उ)** सर्व पात्र व ईच्छुक निविदा धारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा प्रणालीचा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

**ऊ)** निविदाधारक (Bidder) यांना त्याची तांत्रिक आणि आर्थिक प्रस्ताव (Bid) या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ऑनलाइन सादर करणे आहे. निविदा शुल्क (Tender Fee) आणि बयाना ठेव (Earnest Money Deposit) निविदा दस्तऐवजात दिलेल्या तपशीलानुसार ऑनलाइन सादर करणे अनिवार्य आहे.

**ऋ)** कोणत्याही कारणामुळे निविदा ऑनलाइन सादर करण्यात कोणताही विलंब किंवा त्रुटीसाठी निविदा जारी कर्ता जबाबदार राहनार नाही. यासाठी निविदाधारकांना विनंती केली जाते की संपूर्ण आवश्यक निविदा दस्तऐवज (Bid Documents), आंतरजाळ (Internet) मंद गती किंवा इतर कोणत्याही अनपेक्षित समस्या टाळण्यासाठी आधीपासूनच आनलाईन सादर करणे आवश्यक आहे. निविदा (Bid) सादर करण्यासंबंधित काही अडचणी असल्यास निविदाधारक https://mahatenders.gov.in वर दिलेल्या मदत कक्षाशी (हेल्पडेस्क) संपर्क करावा.

२. **निविदेची वेळापत्रक खालील प्रमाणे राहील:-**

| माहिती | तपशील |
|---|---|
| निविदा संदर्भ क्रमांक | MSRLM/SMMU/MINISARAS/03/23-24 |
| ई निविदा आयडी | 2023_MSRLM_948337 |
| निविदा दस्तऐवज डाउनलोड सुरु होण्याची दिनांक आणि वेळ | दिनांक:- २६/०९/२०२३, वेळ : १८:०० |
| स्पष्टीकरणासाठी विनंती करण्याची दिनांक आणि वेळ | दिनांक:- २६/०९/२०२३, वेळ : १८:०० |
| निविदा स्पष्टीकरणासाठी विनंत्या पाठवण्याची अंतिम तारीख आणि वेळ | दिनांक:- ०४/१०/२०२३, वेळ : ११:०० |
| निविदा बोलीपूर्व बैठक ठिकाण दिनांक आणि वेळ | दिनांक:- ०४/१०/२०२३, वेळ : १२:३०<br>उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान<br>राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष |

| | |
|---|---|
| | ५वा मजला, सिडको भवन, दक्षिण बाजू, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -४००६१४ |
| निविदा दस्तऐवज डाउनलोड करण्यासाठी अंतिम दिनांक व वेळ | दिनांक:- १२/१०/२०२३, वेळ : ०३:०० |
| निविदा (Bids) सादर करण्यासाठी अंतिम मुदत दिनांक व वेळ | दिनांक:- १२/१०/२०२३, वेळ : ०३:०० |
| तांत्रिक निविदा / लखोटा उघडण्यासाठी दिनांक आणि वेळ | दिनांक:- १३/१०/२०२३, वेळ : ०३:०० |
| वित्तीय निविदा उघडण्यासाठी दिनांक आणि वेळ | https://mahatenders.gov.in वर प्रकाशित केले जाईल |

सूचना : १. निविदा उघडण्याच्या ठराविक तारखेस खरेदीदारासाठी सुट्टी जाहीर केली असेल तर पुढील कामकाजाच्या दिवशी त्याच वेळेला व त्याच ठिकाणी निविदा उघडल्या जातील.

२. उपरोक्त दिनांक आणि वेळेमध्ये बदलू होऊ शकतो तरी निविदाधारकानी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नमूद केलेल्या सर्व तारखा व वेळ ही अंतिम असेल. त्याकरिता निविदाधारकानी सदर संकेतस्थळावर वारंवार भेट द्यावी / पाहणी करावी.

**३. निविदा संबंधित इतर महत्वाची माहिती:-**

| अ. क्र. | माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | निविदा शुल्क (विना परतावा) | रु. १५,०००/- निविदा सादर करताना ई-निविदा पोर्टलवर ऑनलाईन भरावे लागतील. |
| २ | बयाना ठेव (Earnest Money Deposit) (ऑनलाइन पैसे भरणे) | रु. १,५०,०००/- निविदा सादर करताना ई-निविदा पोर्टलवर ऑनलाईन भरावे लागतील. |
| ३ | निविदा व बयाना ठेव वैधता कालावधी | तांत्रिक निविदा उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवस |
| ४ | कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) | एकूण रु. ५,००,०००/- |
| ५ | बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात कामगिरी सुरक्षा रक्कम /अनामत रक्कम (Performance Security Deposit) देण्यासाठी अंतिम दिनांक | करार / पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून दोन आठवड्यांच्या आत संबधित निविदाधारकाने कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात जमा करणे बंधनकारक आहे . त्याची वैधता करार पूर्ण झाल्यानंतर ६० दिवसांपर्यत असेल. |

-स्वाक्षरीत-

मुख्य कार्यकारी अधिकारी

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष

५वा मजला, सिडको भवन, दक्षिण बाजू, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -४००६१४

संकेतस्थळ- https://www.umed.in

**४. बयाना जमा (Earnest Money Deposit):-**

**अ)** https://mahatenders.gov.in या संकेतस्थळाव्दारे ऑनलाइन पेमेंट गेटवेव्दारे मुद्दा क्र. 3 मध्ये उल्लेखित बयाना (Earnest Money Deposit) जमा करणे अनिवार्य आहे.

**आ)** ज्या निविदादारांनी वर नमूद केल्याप्रमाणे आणि निर्धारित बयाना (Earnest Money Deposit) जमा केलेले नाही त्यांची निविदा (Bid) नाकारली जाईल.

**इ)** अयशस्वी निविदाधारकाची बयाना रक्कम (Earnest Money Deposit) निविदा निश्चितीकरण झाल्यानंतर व यशस्वी/निवड करण्यात आलेल्या निविदाधारकाने कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम जमा केला नंतर किंवा निविदा व बयाना ठेव वैधता कालावधी या मध्ये जे अगोदर असेल त्यानुसार विना व्याज online परत करण्यात येईल.

**ई)** यशस्वी निविदादाराचे बयाना (Earnest Money Deposit) जमा करार करण्यात आल्यानंतर आणि निश्चित कालावधीत बँक गॅरंटी / डिमांड ड्राफ्ट स्वरुपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) जमा केल्यानंतर आणि निविदा दस्तऐवजामध्ये नमूद केल्यानुसार परत केली जाईल.

**५. बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्ती -**

**अ)** निविदा वैधतेच्या कालावधीत निविदाधारक आपली निविदा परत घेत असेल किंवा निविदा वैधतेच्या कालावधीत किंवा त्याच्या वाढीव कालावधीच्या दरम्यान निविदाचे मूल्य वाढवेल तर बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्यात येईल.

**आ)** यशस्वी निविदाधारक निश्चित केलेल्या कालावधीत करारावर सही करण्यास अयशस्वी ठरला किंवा निविदा दस्तावेजात दिलेल्या नमुन्यानुसार निश्चित कालावधीत बँक गॅरंटी / डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) जमा करण्यास अयशस्वी ठरला तर बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्यात येईल.

**इ)** निविदा प्रक्रियेदरम्यान निविदा धारकाच्या विचार पूर्वक करण्यात आलेल्या चुकी च्या कृती मुळे मूल्यांकन आणि अंतमीकरण प्रक्रियेत अनावश्यकपणे विलंब झाल्यास संबंधित निविदाधारकाची बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्यात येईल. बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्याबाबत निविदा जारी कर्ता यांचा निर्णय अंतिम असेल आणि ती निविदाधारकांवर बंधनकारक असेल.

**ई)** जर निविदा प्रक्रियेदरम्यान निविदाधारकाने देण्यात आलेली कोणतीही माहिती चुकीची आढळली तर निविदा जारीकर्ता संबंधित निविदाधाकाची निविदा (Bid) रद्द करू शकतात व संबंधित निविदादारावर आवश्यक कार्यवाही करू शकतील.

**६. संपर्क तपशील:-**

निविदा दस्तऐवज संबंधी कोणत्याही स्पष्टीकरण व संपर्कासाठी, निविदाधारकांना खाली प्रदान केलेल्या संपर्क माहितीवर संवाद साधता येईल.

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| | पद | राज्य अभियान व्यवस्थापक –संपादणूक / विपणन |
| | कार्यालयीन पत्ता | उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान<br>राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष ,५वा मजला ,सिडको भवन ,दक्षिण बाजू , सीबीडी बेलापूर ,नवी मुंबई -४००६१४ , फोन नं: ०२२-२७५६२५५२/५४ |

**७. निविदा सादर करण्यापूर्वी ची विचारणा :-**

निविदादारांचे निविदा संदर्भात काही प्रश्न असल्यास विहित मुदतीत सादर करावेत.

निविदा सादर करण्यापूर्वीच्या उपस्थित केलेल्या प्रश्नांची / शंकांची प्रतिक्रिया / निर्णय https://mahatenders.gov.in वर प्रकाशित केली जाईल. कोणत्याही दूरध्वनी / भ्रमणध्वणी व्दारे विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. निविदा सादर करण्यापूर्वी प्रश्नाच्या उत्तराबाबतचा निविदा जारी कर्ताचा प्रतिसाद निविदा दस्तऐवजाचा अविभाज्य भाग बनेल.

**८. निविदा सादर करण्यापूर्वी ची विचारणा / शुल्क / निविदा करण्यासाठी दुरुस्तीस प्रतिसाद:-**

निविदा जारी कर्ता कोणत्याही वेळेस, कोणत्याही कारणास्तव, स्वतःच्या पुढाकाराने किंवा निविदाधारकाव्दारे विनंती केलेल्या स्पष्टीकरणांच्या उत्तरदायित्वाच्या वेळेस (किंवा निविदा जारीकर्ताने विस्तारित केलेल्या) किंवा आधी कोणत्याही

वेळेस शुद्धीपत्रक जारी करुन निविदा दस्तावेजामध्ये बदल करू शकतो किंवा निविदाच्या तरतूदींच्या व्याख्या स्पष्ट करण्यासाठी अतिरिक्त सूचना निर्गमित करू शकतो. निविदा जारीकर्ता जारी केलेल्या निविदा दस्तऐवजातील दुरुस्ती / शुध्दिपत्रक https://mahatenders.gov.in वर प्रदर्शित केले जाईल आणि या निविदा दस्तऐवजात या संदर्भाव्दारे समाविष्ट केले जाईल असे मानले जाईल. अशा कोणत्याही दुरुस्ती सर्व निविदाधारकावर बंधनकारक असेल. संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या बदलांच्या आधारावर निविदा सुचना / निविदा दस्तऐवज अद्यावत करण्याच्या निविदाधारकाच्या अपयशामुळे या निविदा दस्तऐवजाच्या तरतुदींच्या कोणत्याही चुकीच्या अर्थासाठी निविदा जारीकर्ता जबाबदार राहनार नाही. शुध्दिपत्रक विचारात घेणे व त्याअनुशंगाने निविदाधारकांना त्यांची निविदा तयार करण्यासाठी उचित वाजवी कालावधी देण्यासाठी निविदा जारीकर्ता निविदा सादर करण्यासाठी अंतिम मुदत वाढवू शकतो.

**९. प्रतिसाद पूर्णत्व:-**

**अ)** निविदाधारकांना निविदा दस्तऐवजात सर्व निर्देश, फॉर्म, अटी व शर्ती, आवश्यकता आणि इतर माहितीचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याची सल्ला देण्यात येत आहे. निविदा दस्तावेज काळजीपूर्वक समजून घेतल्यानंतर आणि त्याच्या पूर्ण अर्थ समजून घेतल्यानंतर निविदा सादर करण्यात आलेली आहे असे मानले जाईल.

**आ)** या निविदाचा प्रतिसाद पूर्णतः असावा. निविदा दस्तावेजामध्ये नमूद आवश्यक सर्व माहिती सादर करण्यात अयशस्वी किंवा प्रत्येक बाबतीत निविदा दस्तऐवजास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद न देणाऱ्या निविदाधारकाची निविदा जोखमी मध्ये असेल आणि परिणामी त्याची निविदा नाकारली जाऊ शकते.

**१०. निविदा तयार करण्याचा खर्च:-**

निविदाधारकास निविदा मध्ये सहभागी होण्यासाठी येणारा सर्व खर्च स्वतः करणे आहे. निविदा जारीकर्ता कोणत्याही होणाऱ्या खर्चास जबाबदार राहणार नाही.

**११. राइट टू टर्मिनेशन:-**

निविदा जारीकर्ता कोणत्याही वेळी कोणत्याही कारणाशिवाय निविदा प्रक्रिया समाप्त / रद्द करू शकतो. निविदा जारीकर्ता कोणतीही वचनबद्धता व्यक्त करीत नाही की या प्रक्रियेमुळे कोणाशीही व्यवसायातील व्यवहारावर परिणाम होईल. जर निविदा प्रक्रिया निरस्त करण्यात आली तर कोणत्याही व्याजाशिवाय सर्व निविदादारांचे बयाना ठेव (Earnest Money Deposit) परत केले जाईल.

**१२ निविदामध्ये त्रुटी नसणे:-**

निविदामध्ये कोणतीही त्रुटी नसणे आवश्यक आहे. कोणत्याही अधिलेखनाच्या / दुरुस्ती च्या बाबतीत, अधिकृत स्वाक्षरीकर्त्याव्दारे अधिलेखनाच्या / दुरुस्ती च्या जागेवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

**१३.पेटंट हक्क –**

तृतीय पक्ष / वितरक / पुरवठादार / अभिकर्ता पैकी कॉपीराईट, पेटंट, ट्रेडमार्क किंवा औद्योगिक डिझाइन अधिकारांचे उल्लंघन करनाऱ्या अधिकृत विक्रेत्यांनी केलेल्या कोणत्याही दाव्याच्या बाबतीत, संबधित निविदाधारक वैयक्तिक जबाबदार राहील. जर निविदाधारक याचे पालन करण्यास अयशस्वी ठरला आणि निविदा आमंत्रण प्राधिकरण ला अशा प्रकारच्या उल्लंघनामुळे उद्भवनाऱ्या तृतीय पक्षाला रक्कम अदा करने आवश्यक असेल तर निविदाधारक न्यायालयात प्रकरण व अभिवक्ता शुल्क इत्यादींशी संबंधित सर्व खर्चासह, अशा भरपाईसाठी जबाबदार असेल. निविदा आमंत्रण प्राधिकरण अशा कोणत्याही दाव्यावर यशस्वी निविदाधारकाला सूचना देईल आणि आवश्यक असल्यास निविदाधारका कडून वसुली ची कार्यवाही करेल.

**१४. निविदामध्ये सहभागी होण्यासाठी पात्रता अटी / निकष :-**

निविदा सादर करण्याच्या दिनांकाला निविदाधारकला स्वतंत्रपणे खालील पात्रता निकष पूर्ण करणे अनिवार्य आहे.

| अ क्र | पात्रता अटी / निकष |
|---|---|
| १ | निविदाधारक हा शासन निर्णय क्रमांक: मावज-२०२०/प्र.क्र.३३/का-३४ दि. १६ मार्च २०२० मधील Event and Exhibition Media मधील Category A किंवा B मध्ये नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. |
| २ | निविदाधारकाची दुकान आणि आस्थापना कायद्यांतर्गत परवाना / गुमास्ता परवाना / योग्य नोंदणी प्राधिकरणाकडे नोंदणीकृत प्रमाणपत्र असावे. |

| | |
|---|---|
| ३ | निविदाधारकाची मागील तीन आर्थिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ मध्ये सरासरी उलाढाल (सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्राच्या आधारे) ५०० लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. |
| ४ | निविदाधारक वस्तू व सेवा कर (GST) अंतर्गत नोंदणीकृत असावा. |
| ५ | निविदाधारकाचे / आस्थापनेचे PAN |
| ६ | निविदाधारक निविदा सादर केल्याच्या तारखे पर्यंत कोणत्याही राज्य शासन किंवा केंद्र सरकार विभाग / केंद्रशासितप्रदेश / स्थानिक प्राधिकरणव्दारे काळीसूचीबद्ध किंवा बहिष्कृत केलेला नसले पाहिजे. |
| ७ | निविदाधारकाने 31/03/2023 अखेरपर्यंत वस्तू व सेवा कर (GST) भरणा केला असणे आवश्यक आहे. |
| ८ | निविदाधारकाने मागील तीन आर्थिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ चे सनदी लेखापाल प्रमाणीत ताळेबंद, नफा तोटा पत्रक व आयकर भरल्याचे पत्र जोडणे अनिवार्य आहे. |
| ९ | सन २०२१-२२ पर्यंतचे व्यवसाय कर भरणा केल्याचे प्रत सोबत जोडणे अनिवार्य आहे. |
| १० | निविदाधारकास मागील तीन आर्थिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ मध्ये शासकीय / निमशासकीय /महामंडळे / इतर शासकीय संस्था कार्यालयास या प्रकारच्या सेवा दिल्याचा किमान एक अनुभव हा रु. ५० लक्ष किंवा जास्त रक्कमेचा असावा अथवा<br>दोन अनुभव हे रु. ३५ लक्ष किंवा जास्त रक्कमेचा असावा अथवा<br>तीन अनुभव हे रु. २० लक्ष किंवा जास्त रक्कमेचा असावा अथवा<br>(काम पुर्णत्वाचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.) |

**१५. ऑनलाइन निविदा सादर करण्याबाबत:-**

निविदाधारक ई-निविदा संकेत स्थळ https://mahatenders.gov.in व्दारे ऑनलाईन निविदा सादर करणे आहे. सादर केलेल्या निविदामध्ये तांत्रिक आणि आर्थिक लखोटे समाविष्ट असतील. निविदाधारकाने हे निविदा दस्तऐवजात नमूद केलेले सर्व आवश्यक कागदपत्रे निविदासह आणि निर्धारित नमुन्यातच सादर केले पाहिजेत. आवश्यक कागदपत्रे सादर न करने किंवा कागदपत्रे वेगवेगळया स्वरूपात सादर केल्यामुळे निविदा नाकारली जाऊ शकते. या निविदा दस्तऐवजाच्या प्रतिसादात सादर केलेली सर्व निविदा सर्व बाबतीत बिनशर्त असली पाहिजेत, नसल्यास निविदा जारीकर्ता कडे निविदा नाकारण्याचा अधिकार सुरक्षित राहतो. निविदेचा भाग म्हणून सादर केलेल्या आवश्यक कागदपत्राचे प्रत्येक पृष्ठ मुद्रित केले गेले आहे आणि अधिकृत स्वाक्षरीकर्त्याव्दारे योग्यरित्या स्वाक्षरी केलेले आहे हे तपासण्यासाठी निविदाधारकाची जबाबदारी असेल. कोणत्याही कारणास्तव निविदा सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर निविदा सादर होणार नाही त्यामुळे इच्छुक निविदाधारकांनी शेवटच्या क्षणी निविदा सादर करणे टाळावे.

**अ. तांत्रिक लिफाफा:-**

इच्छुक निविदाधारकांनी खालील तांत्रिक कागदपत्रे ऑनलाइन सादर केली जाणे आवश्यक आहे.

**क)** फॉर्म - १ प्रमाणे निविदा प्रपत्र.

**ख)** फॉर्म - २ मधील निविदाधारकाच्या व्यवसायाचा तपशील.

**ग)** फॉर्म - ३ नुसार सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंस) यांनी प्रमाणित केलेले तीन वित्तीय वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ चे (वैधानिक अहवाला आधारे) आर्थिक उलाढालीचे प्रमाणपत्र.

**घ)** फॉर्म - ५ निविदाधारकाचा अनुभवा संदर्भातील संबधित कागदपत्रासह माहिती (कराराची प्रत किंवा कार्यारंभ आदेश ज्या मध्ये करार मुदतीचा उल्लेख असणे आवश्यक आहे व सोबत काम पूर्णत्व अनुभवाचे प्रमाणपत्र / देयकाची प्रती (Invoice Copy) सादर कराव्यात)

**ङ)** वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र

**च)** फॉर्म – ६ निविदासादर करण्याच्या दिनांक पर्यंत सरकारी उपक्रम किंवा सरकारी संस्था, राज्य सरकार किंवा केंद्र सरकार विभाग / केंद्रशासित प्रदेश / स्थानिक प्राधिकरण / केंद्र आणि राज्य व्दारे काळया यादीत समाविष्ट नसल्याचे १००/- च्या गैर-न्यायिक मुद्रांक पेपर घोषणापत्र.

**छ)** शासन निर्णय क्रमांक: मावज-२०२०/प्र.क्र.३३/का-३४ दि. १६ मार्च २०२० मधील Event and Exhibition Media मधील Category A किंवा B मध्ये नोंदणीकृत असल्याचे विवरण.

**ज)** निविदाधारकाची दुकान आणि आस्थापना कायद्यांतर्गत परवाना / गुमास्ता परवाना / योग्य नोंदणी प्राधिकरणाकडे नोंदणीकृत प्रमाणपत्र.

**झ)** 31/03/2023 अखेरपर्यंत वस्तू व सेवा कर (GST) भरणा केल्याची प्रत.

**ञ)** मागील तीन आर्थिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ चे सनदी लेखापाल प्रमाणीत ताळेबंद, नफा तोटा पत्रक व आयकर भरल्याचे पत्र जोडणे अनिवार्य आहे.

**ट)** सन २०२१-२२ पर्यंतचे व्यवसाय कर भरणा केल्याचे प्रत.

**ठ)** निविदाधारकास मागील तीन आर्थिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ मध्ये शासकीय / निमशासकीय /महामंडळे / इतर शासकीय संस्था कार्यालयास या प्रकारच्या सेवा दिल्याचा किमान एक अनुभव हा रु. ५० लक्ष किंवा जास्त रक्कमेचा असावा अथवा;

दोन अनुभव हे रु. ३५ लक्ष किंवा जास्त रक्कमेचा असावा अथवा;

तीन अनुभव हे रु. २० लक्ष किंवा जास्त रक्कमेचे असावे

(काम पुर्णत्वाचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.)

**ब. आर्थिक लिफाफा:-**

- संकेत स्थळावरील निर्देशानुसार वित्तीय लखोटा https://mahatenders.gov.in वर ऑनलाईन BOQ फॉरमेट मध्ये सादर करणे आवश्यक आहे.
- निविदाधारकास सर्व घटकाचे आर्थिक प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.
- दर सादर करताना साहित्य / वस्तू / सेवा ह्या अभियानाच्या आवश्यकतेनुसार तसेच विभाग / जिल्हास्तरावर लागतील तसे पोहोच करणे आहे.
- दर सादर करताना विना GST सादर करावेत.
- निविदा आणि स्वीकारलेले दर निश्चित कालावधीसाठी निविदाधारकास बंधनकारक असतील आणि कोणत्याही कारणाने करार कालावधी पूर्ण होईपर्यंत त्यात बदल केला जाणार नाही.
- शासनाव्दारे निश्चित केलेल्या विहित पद्धतीने सर्व करांच्या (TDS) वजावटी करण्यात येतील.

## १६. निविदा वैधता:-

निविदा कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी वैध असेल. त्या पेक्षा कमी कालावधीसाठी वैध असलेली निविदा नाकारली जाईल. अपवादात्मक परिस्थितीत निविदा जारीकर्ता त्यांच्या गरजेनुसार निविदाची वैधता कालावधी वाढवण्याबाबत निविदाधारकांना विनंती करू शकते. त्याची विनंती आणि प्रतिसाद लिखित किंवा ईमेलव्दारे केले जातील. निविदाधारक निविदावैधता कालावधी वाढवण्याबाबत नकार देऊ शकतो परंतु अशा परिस्थितीत सदरच्या निविदाधारकास निवड प्रक्रियेतून काढून टाकले जाईल. सदर निविदाधारकाची बयाना रक्कम जप्त करण्यात येणार नाही.

## १७. व्यावसायिक निविदा / वित्तीय निविदामध्ये त्रुटी / सुधार:-

निविदाधारकांना किंमती सादर करण्यास पुरेसी काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. निविदा जमा केल्याच्या शेवटच्या तारखेनंतर सादर केलेल्या आकडेवारी मध्ये कोणत्याही परीस्थितीत बदल होणार नाही. निविदा मध्ये अंकगणित त्रुटींसाठी असल्यास निविदा जारीकर्ताव्दारे त्यामध्ये दुरुस्त केली जाईल व ती निविदाधारकास बंधनकारक राहील. (एकूण केलेली बेरीज रक्कम चुकली असल्यास प्रती नग/युनिट दर ग्राह्य धरून त्यानुसार एकूण बेरीज करून येणारी रक्कम ग्राह्य धरली जाईल. तसेच अंक लिहण्यात चूक झाली असल्यास अक्षरात लिहलेली रक्कम ग्राह्य धरली जाईल.)

## १८. अपात्र निविदा:-

ज्या निविदा खालील बाबीची पूर्तता करणार नाही ती निविदा असुसंगत निविदा म्हणून विचारात घेऊन अपात्र असेल.

**अ)** निविदा दस्तऐवजाच्या आवश्यकतांचे पालन करीत नाही.

**आ)** निविदा दस्तऐवजा मध्ये विनंती केलेल्या विविध प्रारूपाचे (Format) चे पालन करत नाही.

**इ)** निविदाधारकाने निविदा सादर करताना सर्व पात्रता अटींची पूर्तता केली नसल्यास.

**ई)** निविदा च्या वैधते दरम्यान किंवा त्याची वाढीव कालावधी दरम्यान निविदाधारक सादर किंमती वाढवेल.

**उ)** निविदाधारक स्वत: च्या अटी सह निविदासादर करेल.

**ऊ)** निविदा अपूर्ण स्वरूपात प्राप्त झाली असेल.

**ऋ)** तांत्रिक लखोट्या मध्ये अनपेक्षितपणे, अनावश्यकपणे, कराराच्या प्रक्रिये दरम्यान किंवा कराराच्या कार्यकाळात किंवा कराराच्या विस्तार कालावधी मध्ये चुकीची माहिती सादर करण्यात आली असेल.

ऌ) निविदा प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी बेकायदेशीर / भ्रष्ट / फसव्या अर्थाने निविदामूल्यांकनाची प्रक्रिया प्रभावित करण्याचा प्रयत्न केला असेल.

ऍ) जर एखादा निविदाधारक एक पेक्षा अधिक निविदा सादर करेल किंवा दोन किंवा अधिक निविदादारांमध्ये सामान्य स्वारस्य (common interests) आढळल्यास, निविदाधारकांना अयोग्य घोषित केले जाण्याची शक्यता असेल.

ऑ) निविदा जारीकर्ता व्दारे निर्दिष्ट अनुसार निविदाधारक बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) विहित मुदतीत जमा करण्यात अयशस्वी ठरला किंवा विहित मुदतीत करार करून घेण्यास अयशस्वी ठरला.

ए) निविदेच्या संदर्भातील कुठल्याही प्रकारचे प्रचार / प्रभाव / चौकशी अयोग्यता मानली जाईल. निविदा चे मूल्यांकन करताना निविदा जारीकर्ताच्या असा ज्ञानात आले कि काही निविदादारांनी संगनमत करून, गठबंधन करून निविदा भरली आहे असे निदर्शनास आल्यास निविदा जारीकर्ता सदर निविदाधारकांना निविदा मध्ये सहभागी /भाग घेण्यापासून पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

ऐ) जर तांत्रिक लखोट्या मध्ये किंमत, किंमत धोरण, मूल्यमापन यंत्रणा किंवा निविदाच्या व्यावसायिक पैलूबद्दल सूचित केलेली कोणतीही माहिती असेल.

**१९. निविदा उघडणे आणि मूल्यांकन प्रक्रिया:-**

**अ. तांत्रिक निविदा उघडणे:-:-**

तांत्रिक लिफाफे निश्चित केलेल्या वेळेस online उघडले जाईल.

**तांत्रिक दस्तऐवज तपासणी / मुल्यांकन :-**

तांत्रिक निविदाचे मूल्यांकन खालील प्रकारे केले जाईल:

अ) निविदादारांची तांत्रिक निविदाची तपासणी / मुल्यांकन कलम १४ व १५ मध्ये नमूद केलेल्या पात्रता निकषानुसार केले जाईल.

आ) कोणत्याही परिस्थितीत निविदाधारकाव्दारे तांत्रिक निविदांमध्ये प्रदान केलेल्या तथ्यात्मक माहितीमध्ये विचलन झाल्यास किंवा माहिती खोटी आढळल्यास निविदा नाकारली जाऊ शकते.

इ) कोणत्याही वेळी निविदा तपासणी प्रक्रियेदरम्यान निविदा जारीकर्ता निविदाधारकांकडून मौखिक / लिखित स्पष्टीकरण घेऊ शकेल. निविदा जारीकर्ता मूल्यांकन प्रक्रियेत त्यांच्या व्यावसायिक तज्ञांकडून सल्ला घेऊ शकेल. निविदा जारीकर्ता किंवा अधिकृत प्रतिनिधींना कोणताही निर्णय घेण्यापूर्वी निविदा सादर करणाऱ्या निविदादारांची उत्पादन केंद्र/ कारखाना / गोदाम तपासण्याचा अधिकार आहे.

ई) निविदादाराद्वारे नमूद केलेल्या मागील अनुभवाची संदर्भ तपासणी करण्याचा निविदा जारीकर्ताला अधिकार आहे. तपासणी दरम्यान मिळालेला कोणताही अभिप्राय तांत्रिक मूल्यांकन प्रक्रियेत विचारात घेतला जाईल.

उ) जे निविदाधारक निविदा मध्ये नमूद केलेल्या सर्व पात्रता अटींची पूर्तता करतील ते तांत्रिकदृष्ट्या प्रात्र असतील.

ऊ) तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारकांचे गुणांकन करण्यात येईल.

**ऋ) गुणांकन**

| अ.क्र. | विवरण | जास्तीत जास्त गुण | गुण |
|---|---|---|---|
| १ | निविदाधारकाची मागील तीन आर्थिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ मध्ये सरासरी उलाढाल (सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्राच्या आधारे) | २५ | रु. ५०० लक्ष २० गुण, त्यानंतर प्रत्येकी अधिकच्या रु. १० लक्षास १ गुण. (जास्तीत जास्त २५ गुण) |
| २ | या प्रकारचे (ऑक्टोनॉम स्टॉल, साऊड सिस्टीम, सुरक्षा रक्षक, कारपेट, जनरेटर ई) मागील ५ वर्षात (सन २०१८-१९ ते सन २०२२-२३) केलेली प्रदर्शने अनुभवास | २५ | ३ प्रदर्शने १५ गुण, त्यानंतर प्रत्येकी अधिकच्या १ अनुभवास ५ गुण (जास्तीत जास्त २५ गुण) |
| ३ | व्यवसाय स्थापन वर्षे -वर्षांच्या अनुभवाची संख्या -नोंदणीच्या वर्षापासून गणना केली (मार्च २०२३ पर्यंत) | १५ | ३ वर्ष पर्यंत १० गुण, त्यानंतर प्रत्येकी अधिकच्या वर्षासाठी १ गुण(जास्तीत जास्त १५ गुण) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | **पद्धत आणि दृष्टीकोन.**<br>निविदेच्या आवश्यकतेनुसार बोलीदारांनी त्यांची कार्यपद्धती आणि दृष्टीकोन सामायिक करणे.<br>सादरीकरणामध्ये खालील गोष्टींवर भर देणे आवश्यक आहे:<br>अ) नियोजन सुरू झाल्यापासून ते बंद होईपर्यंत तपशीलवार विवरण;<br>ब) घटकवार योजना आणि आउटपुट (क्लिअरन्स, मीडिया आणि आउटरीच, ब्रँडिंग आणि संबंधित आउटपुट, सुरक्षा, अन्न व्यवस्थापन इ.<br>क) लेआउटचे सादरीकरण 3-डी रेखाचित्रांसह असणे आवश्यक आहे. सादरीकरणाने इव्हेंटची संपूर्ण माहिती, त्याचे प्रोफाइल, आवश्यकता, अंमलबजावणीची रणनीती, सुरक्षित आणि सुरक्षित इव्हेंटचा व्यायाम करणाऱ्या अर्थव्यवस्थेची खात्री करण्यासाठी आवश्यक गोष्टी इ.<br>(मूल्यांकन समितीसमोर 10 मिनिटांचे संपूर्ण पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन) | २५ | समितीव्दारे गुणांकन करण्यात येईल. |
| ५ | अनुभव आणि तांत्रिक / व्यावसायिक तज्ञ उपलब्ध मनुष्यबळाच्या कोर टीमची संख्या. | १० | ३ तज्ञ ५ गुण, त्यानंतर प्रत्येकी अधिकच्या १ तज्ञास १ गुण. |

या निविदा दस्तऐवजात निर्दिष्ट केलेल्या नमुन्यांनुसार विनिर्दिष्ट केलेल्या निकषांच्या समर्थनार्थ बोलीदारांनी सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

कोणत्याही परिस्थितीत, तांत्रिक बोलीमध्ये बोलीदाराने दिलेल्या वस्तुस्थितीतील माहितीपासून कोणतेही विचलन झाल्यास, विचलन बोली नाकारू शकते आणि महाराष्ट्र राज्यातील भविष्यातील कोणत्याही निविदांमध्ये सहभागी होण्यास बोलीदाराला बंदी घालू शकते.

बोली मूल्यमापन प्रक्रियेदरम्यान कधीही, एमएसआरएलएम समिती तोंडी मागणी करू शकते / बोलीदारांकडून लेखी स्पष्टीकरण. मूल्यमापन प्रक्रियेत समिती त्यांच्या व्यावसायिक तज्ञांकडून इनपुट घेऊ शकते.

समितीने बोलीदाराने सांगितलेल्या मागील अनुभवाची संदर्भ तपासणी करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. संदर्भ तपासणी दरम्यान प्राप्त झालेला कोणताही अभिप्राय तांत्रिक मूल्यमापन प्रक्रियेदरम्यान विचारात घेतला जाईल.

वर नमूद केलेल्या गुणांकन प्रणालीवर आधारित तांत्रिक मूल्यमापनात १०० पैकी किमान ६० गुण मिळवणारे बोलीदार तांत्रिकदृष्ट्या पात्र म्हणून घोषित केले जातील.

**ब. व्यावसायिक / आर्थिक लिफाफे उघडणे:-**

तांत्रिकदृष्ट्या पात्र व ७० व त्यापेक्षा जास्त गुण असलेल्या निविदाधारकाची व्यावसायिक / आर्थिक लिफाफा ई-निविदा प्रक्रियेनुसार उघडला जाईल. व्यावसायिक निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ https://mahatenders.gov.in या online पोर्टल द्वारे कळविण्यात येईल.

**२०. निवड निकष:-**

- बोलीदाराची निवड ६०:४० वेटेजसह एकत्रित गुणवत्ता-सह-किंमत आधारित प्रणालीवर आधारित असेल, म्हणजे तांत्रिक बोली/प्रस्तावाला ६०% वेटेज आणि आर्थिक बोली/प्रस्तावाला ४०% वेटेज राहील.
- सर्वात कमी मूल्यांकन केलेल्या आर्थिक प्रस्तावाला (Fm) 100 चा कमाल आर्थिक स्कोअर (Sf) दिला जातो.
- इतर सर्व बिड्सचे आर्थिक स्कोअर (Sf) निर्धारित करण्यासाठीचे सूत्र खालीलप्रमाणे मोजले जाते:

- Sf = 100 x Fm/ F, ज्यामध्ये "Sf" हा आर्थिक स्कोअर आहे, "Fm" ही सर्वात कमी किंमत आहे आणि "F" ही विचाराधीन बोलीची किंमत आहे.
- तांत्रिक (T) आणि आर्थिक (P) बोलींना दिलेली वजने आहेत: T = 0.60 आणि P = 0.40
- बोलींना त्यांच्या एकत्रित तांत्रिक (St) आणि आर्थिक (Sf) स्कोअरनुसार वजन (T = तांत्रिक बोलीला दिलेले वजन; P = आर्थिक बोलीला दिलेले वजन; T + P = 1) खालीलप्रमाणे रँक केले जाते:

$$S = St \times T + Sf \times P$$

- निविदा जारीकर्ताने उपरोक्त नमूद बाबीचा पुरवठा करण्यासाठी एक किंवा एका पेक्षा जास्त पुरवठादाराची निवड करण्याबाबतचा हक्क राखून ठेवला आहे.
- जर कराराच्या कालावधीत कोणत्याही वेळी निविदा पुरवठ्यासाठीची किंमत केंद्रीय किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही कायद्याच्या किंवा अधिनियमाव्दारे कमी केली गेली असेल तर निविदाकारला नैतिक आणि वैधानिकदृष्ट्या करार केलेल्या किमती कमी होण्याबाबतची माहिती ताबडतोब निविदा जारीकर्ता / खरेदीदाराला सांगणे बंधनकारक असेल. त्यानुसार दर कमी करण्याचा अधिकार असेल.

**२१.कोणतीही निविदा स्वीकारण्याचा आणि कोणत्याही किंवा सर्व निविदानाकारण्याचा अधिकार:-**

कोणतीही निविदा स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार आणि करार करण्याआधी निविदा प्रक्रिया रद्द करण्याच्या आणि कोणत्याही वेळी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार कोणत्याही दायित्वाविना निविदा जारीकर्ता कडे राखून ठेवला आहे.

**२२. निवडीची अधिसूचना:-**

**अ)** निविदा वैधता कालावधी संपण्यापूर्वी निविदा जारीकर्ता यशस्वी निविदाधारकांना नोंदणीकृत पोस्टव्दारे किंवा ईमेलव्दारे सूचित करेल तसेच त्यामध्ये आवश्यक तपशील, वर्णन, सेवा आणि संबंधित स्वीकारलेल्या किंमतीं बाबत थोडक्यात माहिती दर्शवेल. तसेच निविदा जारीकर्ता निविदा स्वीकारल्या बाबतचे स्वीकार पत्र (Letter of Acceptance) जारी करेल.

**आ)** स्वीकार पत्रप्राप्त झाल्यानंतर यशस्वी निविदाधारक बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) तसेच निर्धारित केलेल्या नमुन्यात करार विहित मुदतीत सादर करेल अन्यथा बयाना ठेव (Earnest Money Deposit) जप्त होईल आणि स्वीकार पत्र / पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल.

**इ)** स्वीकारपत्र / पुरवठा आदेश ची अधिसूचना म्हणजे कराराची रचना होय.

**२३. करार कालावधी -**

करार हा सुरुवातीस एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल आणि समाधानकारक कामगिरीच्या अधीन राहून पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या सक्षम प्राधिकारी व्दारे त्याच अटी व शर्तीवर किंवा काही जोडणे / हटवणे / सुधारणेसह वाढविला जाऊ शकेल. तथापि निर्धारित करार एक महिन्याची नोटीस देऊन कोणत्याही कारणास्तव करार रद्द करण्यात येईल.

**२४. करारः-**

ज्यांची निविदा स्वीकारल्या गेली असेल असे यशस्वी निविदादाराला विहित मुदतीत रु. ५००/- (निविदाधारक मुद्रांक शुल्क खर्च करेल) च्या गैर न्यायिक मुद्रांक कागदावर करार करावा लागेल.

**२५. कामगिरी सुरक्षा ठेव:-**

यशस्वी निविदाधारक स्वत: च्या खर्चाने नमूद केलेली कामगिरी सुरक्षा ठेव डिमांड ड्राफ्ट किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security)निविदा जारीकर्ता कडे जमा करेल.

निविदा जारीकर्ता खालील कारणास्तव कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security) मधून वसूली करण्यास पात्र असेल.

**अ)** निविदादाराव्दारे अनियमिततेसाठी दंड म्हणून लावलेली कोणतीही रक्कम.

**आ)** निविदा जारीकर्ता कोणत्याही निविदाधारक किंवा त्याच्या कोणताही अभिकर्ता / कर्मचारी किंवा कर्मचा-यांचे कोणत्याही डीफॉल्टच्या आधारावर सरकारी / तृतीय पक्षाला जबाबदार असेल अशी कोणतीही रक्कम.

**इ)** कोणत्याही न्यायालय / ग्राहक मंच किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी किंवा त्यांच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीच्या आदेश / निर्णयाखाली केलेले कोणतेही देयक / दंड.

ई) इतर कोणत्याही थकबाकी रक्कम.

या कलमाखाली रक्कम वसूल झाल्यानंतर, निविदाधारक निविदा जारीकर्ता कडे १५ दिवसांच्या आत रकमेच्या मर्यादिपर्यंत परतफेड करेल असे न केल्यास तो कराराचा भंग मानला जाईल आणि तो संपुष्टात येऊ शकतो. अश्या स्थितीत व्याजमुक्त कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security) सहित सर्व रकमेची जप्ती करण्यात येईल.

**२६. दंड:-**

निविदेत नमुद केलेल्या वर्णनाप्रमाने व विहित मुदतीत साहीत्य (भाडेतत्वावर) व सेवेचा पुरवठा न केल्यास प्रती मिनी सरस रक्कम रु- १,००,०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

**२७. फोर्स मेजर** :-

यशस्वी निविदाधारकाच्या नियंत्रणाखाली एक घटना किंवा परिस्थिती जो पूर्व सुचानीय नाही, अपरिहार्य आहे आणि यशस्वी उद्भवणाऱ्या भागाच्या कारणास्तव त्याची लापरवाही किंवा निष्काळजी यामुळे उद्भवणारी नाही. अशा घटनामध्ये युद्ध किंवा क्रांती इत्यादी तसेच आग, पुर, महामारी, अलग ठेवणे प्रतिबंध आणि मालवाहू प्रतिबंधकांचा समावेश असू शकतो परंतु इतकेच मर्यादित नाही. जर फोर्स मेजर परिस्थिती उद्भवली तर यशस्वी निविदाधारक निविदा जारीकर्त्याला तात्काळ अशी परिस्थिती व कारणासाठी लिखित सुचना देईल. अन्यथा निविदा जारीकर्ता करार पार पाडत नसल्याबाबत निविदाधारकावर कारवाई करेल.

**२८. देयक अदा करण्याबाबत अटी:-**

अभियानामार्फत निर्धारित केलेल्या अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेल्या पोहोच पावती देयकासह (Tax Invoice) सादर केल्याच्या दिनांका पासून जर त्यामध्ये काही त्रुटी नसल्यास तीन आठवड्यांत देयक रक्कम देय GST रक्कम सह RTGS किंवा इतर प्रणालीव्दारे अदा केली जाईल.

**२९. आवश्यक बाबींचे विनिर्देश व व्याप्ती**:- कृपया परिशिष्ट अ पाहावे

**परिशिष्ट-अ**

मिनी सरसचे राज्यभर (विभाग / जिल्हा स्तरावर) आयोजन करण्यासाठी लागणा-या वस्तुंची (भाडेतत्वावर) / सेवांची यादी

**तीन दिवसाच्या सरस प्रदर्शनासाठी साधारणत: ५० स्टॉल या प्रमाणे कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र | बाब / साहित्याचे नाव | स्पेसिफिकेशन | एकक | एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ऑक्टॉगनल स्टॉल | ३x३ मिटर | प्रती नग | ५० |
| २ | प्लास्टीक खुर्ची | साधी बिगर कुशन | प्रती नग | १२५ |
| ३ | टेबल | ४'x२' | प्रती नग | ११० |
| ४ | लाईट / स्पॉट लाईट | टयुबलाईट मोठी ४० व्हॅट,४' लांब वायरिंग व फिटींगसह | प्रती नग | ५० |
| ५ | सॉकेट | २ पीन व ३ पीन वायरिंग व फिटींगसह | प्रती नग | ५० |
| ६ | फेसिया | ९ x१ फूट | प्रती नग | ५० |
| ७ | साउंड सिस्टीम | २ स्पिकर,<br>२ माईक, १००० व्हॅट | प्रती नग | ०१ |
| ८ | फलेक्स बॅनर | १०'x४' फ्रेम व बसविणेसह | प्रती नग | १० |
| ९ | स्टँडी | ६x३फूट | प्रती नग | ०४ |
| १० | अग्नीशमन यंत्रे | किमान ५ किलो क्षमता | प्रती नग | ०५ |
| ११ | महिलांची निवास व्यवस्था | मंगल कार्यालय / हॉस्टेल अशा तत्सम सुरक्षित व प्रदर्शनस्थळाच्या जवळील ठिकाणी गरम पाण्याच्या सोयीसह | प्रती व्यक्ती | १०० |
| १२ | चहा, नाष्टा, भोजन | सकाळी नाष्टा (मर्यादित), सकाळ संध्याकाळ चहा, दुपारचे व रात्रीचे पोटभर जेवण | प्रती व्यक्ती | १२५ |
| १३ | सुरक्षा रक्षक | रोज १२ तासाची डयुटी याप्रमाणे | प्रती डयुटी | १२ डयुटी |
| १४ | हाऊस किपिंग स्टॉफ | रोज १२ तासाची डयुटी याप्रमाणे | प्रती व्यक्ती | ०६ |
| १५ | प्लॅस्टीक कचराकुंडी (Garbage Bins) | अंदाजे ४० लीटर क्षमतेचे | प्रती नग | ०४ |
| १६ | कारपेटिंग | ग्रीन मॅटिंग १००' X ६०' | प्रती चौ.फु. | ६०००चौ.फु. |
| १७ | पिण्याचे पाणी | २० लीटरचा जार, कागदी १०० ग्लाससह | प्रती जार | ३० जार |
| १८ | फोटोग्राफी | ३ दिवसांकरिता | प्रती दिन | ३दिवस |
| १९ | इतर किरकोळ खर्च | उदघाटन, बुके व इतर. | प्रती नग | |
| २० | प्रदर्शनासाठी गेट व सजावट | चौकोनी अथवा अर्धगोलाकार बॅनरसह २०' H X १४' W | प्रती नग | ०१ |
| २१ | महिलांसाठी व अभ्यांगतासाठी स्वच्छता गृह व सफाईसह | मोबाईल टॉयलेट | प्रती नग | ०४ |
| २२ | विदयुत पुरवठा व जोडणी | केंबलिंग व प्रदर्शन ठिकाणी जोडणी व पुरवठा | ०१ | ०१ |
| २३ | हॅलोजन लॅम्प | प्रदर्शनात लावणेसाठी उपयुक्त असे अंदाजे १००W | प्रती नग | १६ |
| २४ | जनरेटर सेट | १२५ KV क्षमतेचे | प्रती नग | ०१ |
| २५ | होर्डिंग | २०'X१०' बसविणेसह | प्रती नग | ०६ |
| २६ | पार्किंग व्यवस्था | साईन बोर्ड, बॅनर | प्रती नग | ०१ |

- उपरोक्त वस्तु / सेवा संख्या ही अंदाजीत असुन प्रत्यक्ष मिनी सरस करीता लागणारी संख्या ही कमी / अधीक असु शकेल.
- तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा निहाय/ विभाग स्तरावर विभाग निहाय आवश्यक तेवढ्याच वस्तु / सेवा घेण्यात येतील.
- आर्थिक लिफाफ्यामध्ये साहित्याची माहिती (दर) भरताना प्रती एकक प्रमाणे (एका नगाचे) दर भरण्यात यावेत.

## इतर अटी व शर्ती

१. विभागीय / जिल्हास्तरीय मिनी सरस हे प्रत्येकी **3** दिवसांचे असेल.

२. विभागीय / जिल्हास्तरीय मिनी सरस चा कालावधी, **दिनांक व ठिकाण** सेवा पुरवठाधारकास कळवण्यात आले नंतर किमान २४ तास आगोदर सर्व वस्तु / सेवांची उभारणी करणे आवश्यक आहे.

३. विभागीय / जिल्हास्तरीय मिनी सरस चा कालावधी संपलेनंतर तात्काळ (२४ तास) च्या आत सर्व वस्तु काढूण टाकणे आवश्यक आहे.

४. विविध डिजाईन करताना आवश्यकता भासल्यास उत्तम प्रतीचे फोटो पुरवठादाराने विविध ठिकाणी जाऊन काढणे अनिवार्य राहील.

५. सर्व प्रकारच्या सेवा / वस्तु (भाडेतत्वावर) उपलब्धता करुन देण्याची जबाबदारी ही निवडण्यात आलेल्या निविदाधारकाची असेल.

६. जिल्हास्तरीय / विभाग स्तरीय मिनी सरस हे या विभागाव्दारे निश्चीत करण्यात आलेल्या मैदानावर घेण्यात येईल.

७. निश्चित केलेल्या पुरवठादाराने मिनी सरस करीता मागणी करतील त्यानुसार  वस्तु (भाडेतत्वावर) / सेवा पुरवावयाची आहे. मागणी नुसार वेळेच्या आत वस्तु (भाडेतत्वावर) / सेवा उपलब्ध करून दिली नाही तर हे काम दुस-या पुरवठाधारकाकडून करून घेण्यात येईल आणि याबाबत होणारी नुकसान भरपाई संबधित पुरवठाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

८. मनुष्यबळाअभावी अथवा दुस-या कारणा अभावी वस्तु (भाडेतत्वावर) / सेवा पुरवठा करण्यास व्यत्यय आल्यास अटी व शर्तीचा भंग मानला जाऊन पुरवाठादाराला रु १००००/- प्रती दिन दंड आकारण्यात येईल तसेच उचित कारवाई केली जाईल.

९. परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या वस्तु (भाडेतत्वावर) / सेवा ह्या अंदाजित असुन सर्व वस्तु (भाडेतत्वावर) / सेवा लागतील याची हमी देता येत नाही.

१०. पुरवठादार यांनी परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या व्यतरिक्त लागणारी वस्तु (भाडेतत्वावर) / सेवा या बाजारभावाप्रमाणे देणे बंधनाकारक राहील.

११. वस्तु (भाडेतत्वावर) / सेवा साहित्य पुरविण्याचे काम एका किंवा न्युनत्तमदरावर एका पेक्षा जास्त पुरवठादार यांना विभागून देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी – उमेद यांनी राखून ठेवले आहेत.

१२. पुरवठादाराच्या देयकातून नियमानुसार कर कपात करण्यात येईल व त्याबाबत कोणत्याही प्रकारचे शासकीय / निमशासकीय कराचे माफीचे प्रमाणपत्र पुरवठादारास देण्यात येणार नाही, तसेच कोणत्याही प्रकारचे अग्रिम  देण्यात येणार नाही.

१३. सदर निविदेसंदर्भातील कोणताही न्यायालयीन खटला मुंबई कार्यक्षेत्रात चालविला जाईल.

१४. निविदाधारकाने दर नमूद करताना त्यामध्ये कामासाठी येणारा वाहतूक व इतर खर्च या बाबी विचारात घेऊन दर नमूद करावा.

१५. कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अथवा वेळापत्रकात बदल तसेच एखादी अट शिथिल किंवा बदल करण्याचा हक्क मुख्य कार्यकारी अधिकारी –उमेद यांनी राखून ठेवलेला आहे.

१६. कोणतेही कारण न देता निविदा पत्रकात दर्शविलेले दर मान्य किंवा अमान्य करण्याचे पूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी –उमेद यांना राहतील.

१७. निविदे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी –उमेद यांना राहील व तो निर्णय अंतिम असेल.

**फॉर्म -१ (Bid Form-1)**

निविदा फॉर्म
(निविदाधारकाच्या लेटरहेडवर सादर करणे)

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नाती अभियान
५वा मजला, सिडको भवन, दक्षिण बाजू
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

माननीय महोदय,

मी/आम्ही.................................................व्यवसायाचे नाव ........................................ व्यवसायाचा पत्ता.................................................................................................................................................. .................................................................... जाहीर करतो कि आमचे फर्म चे नाव शासन निर्णय क्रमांक: मावज-२०२०/प्र.क्र.३३/का-३४ दि. १६ मार्च २०२० मधील Event and Exhibition Media मधील Category ________ मध्ये अ.क्र.______ वर नोंदणीकृत आहे.

निविदा दस्तऐवजाची तपासणी करून, आम्ही खालील स्वाक्षरी करणारे पावती देतो की, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत **विभागीय / जिल्हास्तरीय मिनी सरस (प्रदर्शन) करीता एक वर्षासाठी लागणारी विविध वस्तुंची (भाडेतत्वावर) / सेवांची गरजे नुसार पुरविण्यासाठी** निविदा सादर करत असून आमची निविदा उपरोक्त नामांकित निविदा दस्तऐवजाशी पूर्ण सुसंगत आहे आणि आर्थिक लिफाफा मध्ये सादर केलेल्या किंमती आमच्या व्यावसायिक लाखोटा या निविदेचा भाग बनलेला आहे.

राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष कार्यालयासाठी एक वर्षासाठी लागणारी विविध स्टेशनरी व इतर साहित्य गरजे नुसार पुरविण्यासाठी आमच्या संस्थेची निवड करण्यात आल्यास निविदा दस्तऐवजात नमूद केलेली साहित्य पुरवठा करण्याचे आम्ही स्वीकार करीत असून आम्ही कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या निर्धारित वेळेत सादर करू.

निविदा दस्तऐवजात निर्दिष्ट निविदा वैधता कालावधीसाठी आम्ही या निविदाचे पालन करण्यास सहमत आहोत आणि ते आमच्यावर बंधनकारक राहील. निविदा कालावधीच्या समाप्तीपूर्वी कोणत्याही वेळी आपण आमची निविदा स्वीकारू शकता. औपचारिक अंतिम करार तयार होईपर्यंत आणि आमच्या द्वारे अंमलात येईपर्यंत, निविदाधारकाची लिखित स्वीकृती आणि निविदा स्वीकारासह ही निविदा आपल्या दरम्यान बंधनकारक करार असेल. आम्ही मान्य करतो कि आपल्यास प्राप्त होणारी सर्वात कमी किमतीची निविदा किंवा कोणतीही निविदा आपण स्वीकारण्यास बांधील नाही.

स्वाक्षरी -------------------------------

तारीखः

च्या क्षमतेत:

सही करण्यासाठी अधिकृत किंवा अधिकृतव्यक्ती च्या वतीने

निविदादाराचे स्वाक्षरी आणि शिक्का

**फॉर्म -२(Bidders Information : Form-2)**

निविदाधारक माहिती

| **तपशील** | **तपशील** |
|---|---|
| निविदादाराचे नाव | |
| टेलिफोन आणि ईमेल आयडीसह पूर्ण पत्ता | |
| निविदा संबंधित संपर्क तपशील<br>नाव आणि संपर्क तपशील | |
| व्यवसायाच्या स्थापनेचा वर्ष | |
| निविदाधारकाची स्थिती (वैयक्तिक / मालकी / भागीदारी / खाजगी मर्यादित / सोसायटी इ. | |
| पॅन क्रमांक (PAN No.) | |
| वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | |
| आर्थिक वर्षातील वार्षिक उलाढाल<br>२०१९-२०<br>२०२०-२१<br>२०२१-२२ | |
| शासन निर्णय क्रमांक: मावज-२०२०/प्र.क्र.३३/का-३४ दि. १६ मार्च २०२० मधील Event and Exhibition Media मधील | Category ________ मध्ये अ.क्र._____ वर नोंदणीकृत आहे. |

निविदादाराचे स्वाक्षरी आणि शिक्का

# FORM -3

**Format for submission of Turnover certificate on CA firms letter head**

**TO WHOMSOEVER IT MAY CONCERN**

This is to certify that M/s. (name of bidders firm) is having registered office at (detailed office address of bidder). The turnover of M/s. (Name of bidders firm) for the three financial years based on Audited Statement is as under

| **Sr. No.** | **Financial Year** | **Turnover in lakhs** |
|---|---|---|
| 1 | 2019-20 | |
| 2 | 2020-21 | |
| 3 | 2021-22 | |
| | Average Turnover | |

Signature of the Chartered Accountant

Name of the Firm

Registration No.

Date:

Place:

(Seal of the Chartered Accountant)

फॉर्म-४( Financial bid format Form-4)
व्यवसायिक (आर्थिक) निविदा चे प्रपत्र

संकेत स्थळावरील निर्देशानुसार वित्तीय लखोटा https://mahatenders.gov.in वर ऑनलाईन BOQ फॉरमेट मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

**फॉर्म -५**

**स्टेशनरी पुरवठा अनुभवाचा तपशील**

निविदाधारकाने शासकीय / निमशासकीय /महामंडळे / इतर शासकीय संस्था कार्यालयास या प्रकारच्या वस्तुंची (भाडेतत्वावर) / सेवांची पुरवठा केल्याचा कामाचा अनुभव तपशील

| अ. क्र | पुरवठा आदेश देणा-या कार्यालयाचे नांव व पत्ता | वस्तुंची (भाडेतत्वावर) / सेवांची पुरवठा करण्याचे ठिकाण | पुरवठा आदेश क्र व तारीख | वस्तुंची (भाडेतत्वावर) / सेवांची पुरवठा करण्याच्या कराराची मुदत | | वस्तुंची (भाडेतत्वावर) / सेवांची पुरवठा करण्यात आलेली एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दिनांक (पासून) | दिनांक (पर्यंत) | |
| ०१ | | | | | | |
| ०२ | | | | | | |
| ०३ | | | | | | |
| ०४ | | | | | | |
| ०५ | | | | | | |
| ०६ | | | | | | |
| ०७ | | | | | | |
| ०८ | | | | | | |
| ०९ | | | | | | |
| १० | | | | | | |

निविदाधारकाची अधिकृत स्वाक्षरी

**Signature and seal of the Bidder**

टीप:

१. निविदा मध्ये नमूद केलेल्या पात्रता अटीच्या नुसार माहितीसादर करणे बंधनकारक आहे .

२. वरील माहितीच्या अनुषंगाने संबधित कार्यालयासोबतच्या कराराची प्रत किंवा कार्यारंभ आदेश व सोबत काम पूर्णत्व अनुभवाचे प्रमाणपत्र / देयकाची प्रती (Invoice Copy) सादर कराव्यात. तसेच वरील दस्तऐवजात करार मुदत नमूद असणे बंधनकारक आहे करार मुदत व संख्या नमूद नसल्यास निविदा नाकारण्यात येईल.

**फॉर्म-६**

**घोषणा पत्र (Declaration)**

**(रु.१०० /- च्या गैर-न्यायिक मुद्रांक पेपरवर)**

मी/आम्ही.................................................व्यवसायाचे नाव ........................................ व्यवसायाचा पत्ता.................................................................................................................................................

.................................................................... जाहीर करतो कि **<u>विभागीय / जिल्हास्तरीय मिनी सरस करीता एक वर्षासाठी लागणारी विविध वस्तुंची (भाडेतत्वावर) / सेवांची गरजे नुसार पुरविण्यासाठी</u>** निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचा मी / आम्ही पालन करेन. तसेच मंजूर झालेले दर हे करार कालावधी दरम्यान वैध राहतील.

मी / आम्ही असे घोषित करतो की मी कोणत्याही न्यायालयाच्या कायद्याव्दारे दोषी ठरवले नाही किंवा मी / आम्ही कोणत्याही राज्य सरकार किंवा केंद्र सरकार विभाग / केंद्रशासित प्रदेश / स्थानिक प्राधिकरण / केंद्र व राज्य सरकार यांच्याद्वारे मान्यताप्राप्त सरकारी संस्था द्वारे या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याच्या दिनांक पर्यंत काळी सूचीबद्ध केलेली नाही.

मी / आम्ही सहमत आहे की निविदा जारीकर्ता आमच्याकडे पुरविलेल्या माहितीची तपासणी/ सत्यापन करताना सादर करण्यात आलेली माहिती खोटी असल्याचे सिद्ध झाल्यास तसेच आमच्या द्वारे निविदा दस्तेवज मध्ये नमूद अटी आणि नियमांचे पालन करण्यात आले नाही तर बयाना रक्कम (Earnest Money Deposit) आणि कामगिरी सुरक्षा रक्कम /अनामत रक्कम (Performance Security Deposit) जप्त करेल आणि तीन (3) वर्षे कालावधी करिता मला /आम्हाला शासनाच्या काळ्या यादित समाविष्ट करेल.

दिनांक :-

शिक्का

निविदाधारकाची अधिकृत स्वाक्षरी

टीप: रु.१०० /- च्या गैर-न्यायिक मुद्रांक पेपरहा शासकीय नियमानुसार वैध्य असणे आवशक आहे अन्यथा निविदा नाकारण्यात येईल.